# प्रेसनोट

दि. ०४/०३/२०२५

ॲन्टी करप्शनच्या पुणे घटकाकडून चिंचवड मंडलाधिकारी यांना लाच मागणी व लाच स्विकारले प्रकरणी ताब्यात घेतलेबाबत.

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | पिंपरी पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड आयुक्तालय, पुणे |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ अन्वये |
| तक्रारदार | पुरुष, वय ५३ वर्ष |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | श्री. सुरेंद्र साहेबराव जाधव, वय ५६ वर्ष, पद - मंडलाधिकारी, चिंचवड कार्यालय, पिंपरी, पुणे. (वर्ग-३) (अराजपत्रित) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ५,००,०००/- (पाच लाख) रुपये |
| पडताळणी दरम्यान तडजोडीअंती लाच मागणी रक्कम | ४,५०,०००/- (चार लाख पन्नास हजार) रुपये |
| स्वीकारलेली लाच रक्कम | ४,००,०००/- (चार लाख) रुपये |
| पडताळणी दिनांक | ०४/०३/२०२५ |
| सापळा दिनांक | ०४/०३/२०२५ रोजी |
| ठिकाण | मंडलाधिकारी कार्यालय, चिंचवड, ता. हवेली, जि. पुणे. |
| तपास अधिकारी यांचे नाव व पद | श्रीमती. भारती मोरे, पोलीस उप-अधीक्षक, लाप्रवि, पुणे (मो.क्र. ९८७०१५६५८६) |

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांनी वाल्हेकरवाडी येथे ६ गुंठे जागा घेवून त्यावर एक बंगला बांधला आहे. नमुद बंगल्याची सातबारा उता-यात नोंद करण्यासाठी लोकसेवक सुरेंद्र जाधव, मंडलाधिकारी यांनी तक्रारदाराकडे ५ लाख रुपयाच्या लाचेची मागणी केल्याबाबतची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे दिली होती.

प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने दि. ०४/०३/२०२५ रोजी लोकसेवक सुरेंद्र जाधव यांचेकडे पंचासमक्ष पडताळणी केली असता, लोकसेवक सुरेंद्र जाधव यांनी तक्रारदाराकडे वरील नमुद काम करण्यासाठी तडजोडीअंती ४,५०,००० रुपयाची मागणी केल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार आज दि. ०४/०३/२०२५ रोजी केलेल्या सापळा कारवाई दरम्यान लोकसेवक सुरेंद्र जाधव यांनी मागितलेल्या लाच रक्कमेपैकी तक्रारदाराकडून ४,००,०००/- रुपयाची लाच त्यांच्या सरकारी कार्यालयाचे पार्किंगमध्ये पंचासमक्ष स्विकारुन, ती लाच रक्कम त्यांनी त्यांच्या पांढ-या रंगाच्या ह्युंदाई क्रेटा कार गाडी नं. **MH 14 / JQ / 8282** या गाडीत ठेवली असता, त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले असून, ती लाच रक्कम पंचासमक्ष गाडीतून जप्त करण्यात आलेली आहे. लोकसेवक सुरेंद्र जाधव, मंडलाधिकारी यांचेविरुद्ध पिंपरी पोलीस स्टेशन, पिंपरी चिंचवड आयुक्तालय येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ अन्वये गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, पुणे व अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
२) व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
३) ई-मेलआयडी - पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
४) वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**
५) ऑनलाईन ॲप तक्रार - **www.acbmaharashtra.net.in**

सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक ब्युरो

४/३/२५

(दयानंद गावडे)
**सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक, (प्रशासन)**
**लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.**

Scanned with CamScanner